नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ६५ | Issue - 65 | वार मंगळवार दि. २२ जुलै २०२५ | Blow- Tuesday Date 22 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## मुंबईत २००६ साली झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातील १२ आरोपींची निर्दोष सुटका

### आरोपींना निर्दोष सोडल्याने तपास यंत्रणांना मोठा झटका बसला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: मुंबईत २००६ साली झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणात (चींलरळ ढीरळप इश्ररींं) १२ आरोपींची निर्दोष सुटका करण्यात आली आहे. मुंबईत २००६ साली झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणात उच्च न्यायालयाने आज (२१ जुलै) महत्त्वाचा निकाल दिला. मुंबईतील लोकल ट्रेनमध्ये झालेल्या या साखळी बॉम्बस्फोटात २०९ जणांचा मृत्यू झाला होता. तर ८०० हून अधिकजण जखमी झाले होते. मात्र, उच्च न्यायालयाने याप्रकरणातील सर्व १२ आरोपींना निर्दोष सोडल्याने तपास यंत्रणांना मोठा झटका बसला आहे.





२०१५ साली विशेष न्यायालयाने याप्रकरणातील १२ आरोपींना दोषी ठरवत पाच जणांना फाशी आणि सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. आरोपींनी या शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. पोलिसांनी आपल्याला मारहाण करुन जबाब नोंदवले असा आरोप याप्रकरणातील दोषींनी केला होता. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. आजच्या सुनावणीला आरोपी येरवडा, नाशिक, अमरावती आणि नागपूर कारागृहातून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे लावली हजेरी लावली होती. उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्यानंतर या आरोपींनी आनंद व्यक्त केला.

आज कोर्टात काय काय घडलं?

१. आरोपींना शिक्षा द्यावी असे पुरावे समोर आले नाहीत- हायकोर्ट

२. साक्षीदारांच्या साक्षी विश्वास ठेवण्यासारख्या नाहीत- हायकोर्ट

३. स्फोटाच्या १०० दिवसांनंतर साक्षीदारांना आरोपी आठवणं अशक्य- हायकोर्ट

४. स्फोटांसाठी वापरलेले बॉंब ओळखण्यात तपास संस्थेला अपयश- हायकोर्ट

५. बॉम्बच माहित नाही तर मिळालेल्या बॉंब, बंदुका,नकाशा या पुराव्यांना अर्थ नाही- हायकोर्ट

६. बॉम्ब, बंदुका, नकाशे जुळून आले नाही- हायकोर्ट

मुंबईतील लोकल ट्रेन्समध्ये ११ मिनिटांत पाच ठिकाणी स्फोट झाले होते. चर्चगेट ते बोरिवली स्थानकांदरम्यान हे स्फोट झाले होते. या स्फोटांसाठी कुकर बॉम्बचा वापर करण्यात होता. ११ जुलै २००६ रोजी ११ मिनिटांत झालेल्या ७ स्फोटांनी मुंबई हादरली होती. २०१५ साली सत्र न्यायालयाने १३ आरोपींपैकी बारा आरोपींना दोषी ठरवत पाच जणांना फाशी तर उर्वरित सात जणांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती.दोषींनी त्यांच्या शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान दिलं होत तर राज्य सरकारने फाशीच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब करण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

## जगदीप धनखड यांचा राजीनामा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





नवी दिल्ली : पदावर असतानाच प्रकृतीच्या किंवा इतर कारणामुळे राजीनामा देऊ करणारे देशाचे पहिले उपराष्ट्रपती, अशी नोंद झालेले राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांचा राजीनामा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू स्वीकारतात की नाही, हे काही तासांमध्ये स्पष्ट होईल. मात्र, उपराष्ट्रपती धनखड जर आपल्या राजीनाम्यावर ठाम असतील व राष्ट्रपतींनी त्यांचा राजीनामा स्वीकारण्याचा निर्णय घेतला तर या पदासाठी दुसऱ्या नेत्याची निवड करणे क्रमप्राप्त असेल.

### महाराष्ट्रातील बड्या नेत्याचे नाव आघाडीवर

त्या परिस्थितीत राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे नाव सर्वाधिक आघाडीवर आहे. याशिवाय तमिळनाडूचे राज्यपाल रवी किंवा बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्याही नावाचा या पदासाठी विचार होऊ शकतो, असे समजते. उपराष्ट्रपती धनखड यांनी धक्कातंत्राचा वापर करीत पदाचा राजीनामा दिल्याची बातमी सोमवारी रात्री १० वाजल्यानंतर वाऱ्याच्या वेगाने पसरली. विरोधकांनी अविश्वास ठराव आणण्याचा प्रयत्न केला, असे पहिले उपराष्ट्रपती अशी नोंद झालेले धनखड यांच्या गेले काही दिवस प्रकृतीच्या कुरबुरी सुरू होत्या.

नुकतेच त्यांचे एम्समध्ये हृदयाचे ऑपरेशनही झाले होते. मात्र, संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसभर किंवा त्याच्याही आधी देशभरात दौरे करताना त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्याचा अंदाज कोणालाही आला नाही. राज्यसभेत धनखड यांनी दोनदा भाषणे केली. त्यानंतर सर्वपक्षीय नेत्यांची बैठकही त्यांच्या दालनात झाली होती. धनखड यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे राजीनामा पाठवला असून, तत्काळ प्रभावाने मी हे पद सोडत आहे, असे त्यांनी यात म्हटले आहे. 'प्रकृतीची प्राधान्याने काळजी घेण्याचा वैद्यकीय सल्ला मला देण्यात आल्याने मी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा देत आहे. राज्यघटनेच्या कलम ६७ (अ) अंतर्गत स्वेच्छेने हा निर्णय घेतला आहे,' असेही त्यांनी राष्ट्रपतींना उद्देशून लिहिले आहे. ७४ वर्षीय धनखड यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये या पदाची सूत्रे स्वीकारली होती.

'राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतो. सर्वांनी मला कार्यकाळात पाठबळ दिले आणि त्यांच्याशी सौहार्दपूर्ण संबंध होते. पंतप्रधानांचा पाठिंबा अमूल्य होताच; त्यांच्याकडून बरेच शिकता आले,' असे धनखड यांनी म्हटले आहे.

## केंद्राची भूमिका स्पष्ट; त्रिभाषा सूत्रात कोणत्या भाषा शिकवायच्या हा राज्याचा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केंद्र सरकारच्या त्रिभाषासूत्रीनुसार महाराष्ट्र सरकारने पहिल्यांदा तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषा सक्तीचा निर्णय घेतला होता. त्यानुसार, शाळेत इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्ती करण्यात येणार होती. मात्र, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेल्या विरोधानंतर राज्य सरकारने हिंदीसह इतर भाषांचा पर्याय दिला. मात्र, मनसे, शिवसेनेसह विरोधी पक्षाच्या इतरही नेत्यांनी विरोध केल्यानंतर महाराष्ट्र शासनाने लागू केलेला त्रिभाषासूत्रीचा शासन आदेश रद्द करण्यात आला आहे. आता, महाराष्ट्रातील महायुती सरकारच्या या निर्णयावर केंद्र सरकारने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्रिभाषा सूत्रात कोणत्या भाषा शिकवायच्या हा राज्याचा निर्णय आहे, असे केंद्र सरकारने म्हटलं आहे.

महाराष्ट्र सरकारने त्रिभाषासूत्रीचा शासन आदेश रद्द केल्यानंतर केंद्र सरकारच्यावतीने आपली भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. महाराष्ट्र सरकारने रद्द केलेल्या शासननिर्णयाची माहिती आम्हाला दिली आहे. मात्र, त्रिभाषा सूत्र कायम राहणार असून त्रिभाषा सूत्रात कोणत्या भाषा शिकवायच्या हा राज्याचा निर्णय आहे, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

भाषा कोणत्या शिकवायच्या तो राज्य सरकारचा निर्णय, भाषेबाबत केंद्र सरकारची बळजबरी नाही. मात्र, तीन भाषा माध्यमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शिकायच्या आहेत. त्यामुळे ६ वी किंवा ७ वी इयत्तेत विद्यार्थी आपणास पुढे शिकायची भाषा निवडू शकतात. केंद्राच्या निर्णयानुसार तीनपैकी दोन भाषा भारतीय असव्यात इतकीच राष्ट्रीय धोरणाची अपेक्षा आहे. त्यामध्ये, या दोन भाषा कोणत्या असाव्यात हा निर्णय सर्वस्वी राज्य शासनाचा आहे, असे केंद्राने स्पष्ट केले. महाराष्ट्राने रद्द केलेल्या जीआरवरुन डीएमके खासदार माथेश्वरन व्ही.एस. यांनी संसदेच्या अधिवेशनात पहिल्याच दिवशी हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर, केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी हे उत्तर लोकसभेत लेखी स्वरुपात दिले आहे. त्यामुळे, त्रिभाषासूत्री धोरण राज्यांना लागू राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

**त्रिभाषासूत्री धोरण लागू करणारच : मुख्यमंत्री**

दरम्यान, राज्यात विरोधी पक्ष आणि ठाकरे बंधूंनी केलेल्या विरोधानंतर त्रिभाषासूत्रीवरुन घेण्यात आलेला शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे. तसेच, यासंदर्भात नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नव्याने समिती गठित करण्यात आली असून या समितीचा अहवाल आल्यानंतर नवीन शासन निर्णय जारी केला जाईल. मात्र, राज्यात त्रिभाषासूत्री धोरण लागू करणारच अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे.

## राज्यात मान्सूनचे वारे पुन्हा सक्रिय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : मान्सूनचे वारे पुन्हा सक्रिय झाले असून, आता वातावरणीय स्थितीही पावसासाठी अनुकूल असल्याची माहिती मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्राच्या प्रमुख शुभांगी भुते यांनी दिली. आर्द्रता वाढली असून वाऱ्यांचा वेगही वाढण्याची शक्यता आहे. दक्षिण ओडिशाच्या वर हवेच्या वरच्या थरात चक्रीय वातस्थिती निर्माण झाली आहे, तसेच उत्तर कर्नाटक ते आंध्र प्रदेशच्या दक्षिण किनाऱ्यापर्यंत पूर्व-पश्चिम द्रोणीय स्थिती निर्माण झाली आहे. बंगालच्या उपसागरात उत्तरेला कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता असून यामुळे राज्यातील पावसाला २७ जुलैपर्यंत चालना मिळेल, असा अंदाज आहे.

जुलै महिन्यातील पहिले २० दिवस फारसा पाऊस न झालेल्या मुंबईने रविवारी रात्रीपासून मात्र जोरदार पाऊस अनुभवला आणि अखेर जुलैचा पाऊस भेटीला आल्याची भावना मुंबईकरांनी व्यक्त केली. रविवारी आणि सोमवारी दोन्ही दिवस मुंबईच्या उपनगरांमध्ये पावसाचे प्रमाण अधिक होते. सोमवारी वर्तवलेल्या अंदाजानुसार, दक्षिण कोकणामध्ये पुढील चारही दिवस 'ऑरेंज लर्ट' देण्यात आला आहे. मुंबईमध्येही बुधवार, गुरुवारी तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

मुंबईमध्ये सांताक्रूझ केंद्रावर रविवारी स. ८.३० ते सोमवारी स. ८.३० या २४ तासांत ११४.६ मिमी पावसाची नोंद झाली. त्याचवेळी कुलाबा येथे केवळ ११.२ मिमी पाऊस नोंदला गेला. कोकणामध्ये तुरळक ठिकाणी पावसाचा जोर वाढलेला होता. अलिबाग येथे ९० मिमी, मुरुड ७७ मिमी, श्रीवर्धन ६५ मिमी पावसाची नोंद झाली. दक्षिण कोकणात पावसाचा जोर येत्या चार ते पाच दिवसांमध्ये वाढण्याचा अंदाज आहे. मुंबईमध्ये सोमवारी स. ८.३० ते सायं. ५.३० या वेळेत सांताक्रूझ येथे ८७ मिमी, तर कुलाबा येथे केवळ आठ मिमी पावसाची नोंद झाली. विलेपार्ले, सांताक्रूझ येथे ९० मिमीहून अधिक पाऊस दिवसभरात नोंदला गेला. मंगळवार ते शुक्रवार या कालावधीत रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीनही जिल्ह्यांना 'ऑरेंज लर्ट' देण्यात आला आहे. या तुलनेत उत्तर कोकणात पावसाचा जोर कमी असेल. बुधवार, गुरुवारी तुरळक ठिकाणी मुंबई, ठाणे येथे मुसळधार पाऊस पडू शकेल. ठाणे जिल्ह्याला गुरुवारी 'ऑरेंज लर्ट' आहे. पालघरमध्ये बुधवारी, गुरुवारी मुसळधार पाऊस पडू शकतो. कोल्हापूर, सातारा घाट परिसराला मंगळवारपासून, तर पुणे घाट परिसराला बुधवारपासून 'ऑरेंज लर्ट' आहे.

### कर्तव्यपूर्ती सोहळ्याचे आयोजन

### मराठी जनतेसाठी अभिमानास्पद; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळांमध्ये स्थान भारतासाठी गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य हे नेहमीच वैश्विक होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिल्याने त्यांच्या कार्याच्या जागतिकतेला औपचारिक स्वरूपात प्रतिष्ठा लाभली आहे. हा गौरव संपूर्ण देशासाठी आणि मराठी जनतेसाठी अभिमानास्पद आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळांचा दर्जा मिळाल्याचे औचित्य साधत सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांच्या पुढाकारने प्रभादेवी येथील पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, रवींद्र नाट्यमंदिर, येथे कर्तव्यपूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास पंडित हृदयनाथ मंगेशकर, श्रीमती उषाताई मंगेशकर, कौशल विकास, नाविन्यता व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार, आमदार सर्वश्री प्रवीण दरेकर, कालिदास कोळंबकर, कॅप्टन रवी सेल्वन, प्रसाद लाड, अमित साटम, संजय उपाध्याय, सुनील राणे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र शासनाकडून पाठवण्यात आलेल्या १२ किल्ल्यांच्या नामांकनाला केंद्र शासनाने प्राधान्य दिले आणि युनेस्कोसमोर १२ किल्ल्यांची अधिकृत शिफारस केली. देशभरातून विविध राज्यांनी अनेक स्थळे सुचवली होती, पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांनीच भारताचे प्रतिनिधित्व करावे, याबाबत आग्रही होते. यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने पुढाकार घेतला. याबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी विशेष आभार मानले.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांस्कृतिक कार्य विभागाचे माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि विद्यमान मंत्री ड. आशिष शेलार यांचे विशेष कौतुक केले. आशिषजींनी हे तांत्रिक सादरीकरण पॅरिसमध्ये जाऊन केले आणि युनेस्कोच्या अधिकाऱ्यांसमोर किल्ल्यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या आणि सर्व टीमच्या योगदानामुळेच हा गौरव शक्य झाला, असे श्री.फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी किल्ल्यांच्या स्थापत्यकलेचे विविध पैलू उलगडत त्यांचे ऐतिहासिक आणि सामरिक महत्त्व सांगताना म्हणाले की, राजगड, रायगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी हे किल्ले हे केवळ ऐतिहासिक वास्तू नाहीत, तर स्वराज्याचे आधारस्तंभ आहेत.

या जलदुर्गांचं बांधकाम त्या काळात किती कठीण होते, हे आजही समजून घेणे कठीण आहे. मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांनी अशक्यप्राय गोष्टी शक्य करून दाखवल्या. सिंधुदुर्ग किल्ल्याच्या बांधकामात ३२ लाख किलो चुना आणि १० लाख किलो लोखंड वापरण्यात आले. यावरून महाराजांच्या दूरदृष्टीची आणि प्रशासनिक कौशल्याची प्रचिती येत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यकारभारातील किल्ल्यांच्या भूमिकेवरही प्रकाश टाकला. दुर्ग म्हणजे राज्याचा आधार. छत्रपती शिवाजी महाराज यांचे म्हणणे होते की, ३६३ किल्ल्यांचे संरक्षण करताना कोणतीही साम्राज्य शक्ती हे स्वराज्य ताब्यात घेऊ शकणार नाही. या ऐतिहासिक क्षणाबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या यशामध्ये योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या वतीने मी हा पुरस्कार स्वीकारतो आहे.

या गौरवप्रसंगी प्रसिद्ध संगीतकार पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते सन्मान स्वीकारताना, मुख्यमंत्री म्हणाले, त्यांच्या संगीताने आणि गीतांनी मराठी माणसाच्या हृदयात राष्ट्रभक्तीचा आणि स्वाभिमानाचे तेज निर्माण केले आहे. 'शिवकल्याण राजा' मधून मिळणारी प्रेरणा आजही तितकीच स्फूर्तीदायक आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम हा अद्वितीय आणि अतुलनीय आहे. युद्धनीती, शौर्य आणि सुशासन यांचे अभूतपूर्व उदाहरण म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा कार्यकाळ. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य थक्क करणारे असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण, उभारणी आणि पुनर्बांधणी केलेल्या असंख्य किल्ल्यांमध्ये १२ महत्त्वाचे किल्ले 'मराठा मिलिटरी लँडस्केप' या प्रस्तावात समाविष्ट करण्यात आले. यामध्ये ११ किल्ले महाराष्ट्रातील असून, एक तामिळनाडूमधील जिंजी हा किल्ला आहे. या प्रस्तावाची पायाभरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात झाली असल्याचे मंत्री ड.शेलार यांनी सांगितले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित मराठी गीते, पोवाडे, स्मृतिगीते आणि जाणता राजा महानाट्यातील शिवराज्याभिषेक सोहळा हे कार्यक्रम झाला. या कार्यक्रमास उपस्थित सर्व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## संपादकीय....

# मान्सून पुन्हा सक्रिय

मान्सूनचे वारे पुन्हा सक्रिय झाले असून, आता वातावरणीय स्थितीही पावसासाठी अनुकूल असल्याची माहिती मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्राच्या प्रमुख शुभांगी भुते यांनी दिली. आर्द्रता वाढली असून वाऱ्यांचा वेगही वाढण्याची शक्यता आहे. दक्षिण ओडिशाच्या वर हवेच्या वरच्या थरात चक्रीय वातस्थिती निर्माण झाली आहे, तसेच उत्तर कर्नाटक ते आंध्र प्रदेशच्या दक्षिण किनाऱ्यापर्यंत पूर्व-पश्चिम द्रोणीय स्थिती निर्माण झाली आहे. बंगालच्या उपसागरात उत्तरेला कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता असून यामुळे राज्यातील पावसाला २७ जुलैपर्यंत चालना मिळेल, असा अंदाज आहे. जुलै महिन्यातील पहिले २० दिवस फारसा पाऊस न झालेल्या मुंबईने रविवारी रात्रीपासून मात्र जोरदार पाऊस अनुभवला आणि अखेर जुलैचा पाऊस भेटीला आल्याची भावना मुंबईकरांनी व्यक्त केली. रविवारी आणि सोमवारी दोन्ही दिवस मुंबईच्या उपनगरांमध्ये पावसाचे प्रमाण अधिक होते. सोमवारी वर्तवलेल्या अंदाजानुसार, दक्षिण कोकणामध्ये पुढील चारही दिवस 'ऑरेंज लर्ट' देण्यात आला आहे. मुंबईमध्येही बुधवार, गुरुवारी तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. कोकणामध्ये तुरळक ठिकाणी पावसाचा जोर वाढलेला होता. अलिबाग येथे ९० मिमी, मुरुड ७७ मिमी, श्रीवर्धन ६५ मिमी पावसाची नोंद झाली. दक्षिण कोकणात पावसाचा जोर येत्या चार ते पाच दिवसांमध्ये वाढण्याचा अंदाज आहे. मुंबईमध्ये सोमवारी स. ८.३० ते सायं. ५.३० या वेळेत सांताक्रूझ येथे ८७ मिमी, तर कुलाबा येथे केवळ आठ मिमी पावसाची नोंद झाली. विलेपार्ले, सांताक्रूझ येथे ९० मिमीहून अधिक पाऊस दिवसभरात नोंदला गेला. मंगळवार ते शुक्रवार या कालावधीत रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीनही जिल्ह्यांना 'ऑरेंज लर्ट' देण्यात आला आहे. या तुलनेत उत्तर कोकणात पावसाचा जोर कमी असेल. बुधवार, गुरुवारी तुरळक ठिकाणी मुंबई, ठाणे येथे मुसळधार पाऊस पडू शकेल. ठाणे जिल्ह्याला गुरुवारी 'ऑरेंज लर्ट' आहे. पालघरमध्ये बुधवारी, गुरुवारी मुसळधार पाऊस पडू शकतो. कोल्हापूर, सातारा घाट परिसराला मंगळवारपासून, तर पुणे घाट परिसराला बुधवारपासून 'ऑरेंज लर्ट' आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीः गरजू रुग्णांसाठी आधारवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

एखाद्या कुटुंबातील व्यक्तीला गंभीर आजार होतो, तेव्हा त्या कुटुंबावर एक प्रकारचा आघात होतो. त्यावेळी ते कुटुंबे केवळ शारीरिक आणि मानसिक त्रासानेच नव्हे, तर आर्थिक अडचणींनीही खचून जातात. अनेकदा उपचारांचा खर्च खूप येत असल्याने गरीब रुग्ण हतबल होतात. अशा परिस्थितीत, मुख्यमंत्री सहाय्यता निधी (उहळशष चळपळीींशीं'ी 'ीळीींरपलश ऋीपव) गरजू रुग्णांसाठी एक आधारवड ठरतो.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी ही राज्य शासनाची एक महत्त्वपूर्ण योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून गरीब व गरजू रुग्णांना आर्थिक मदत दिली जाते. गंभीर आजारांवर उपचार करण्यासाठी तसेच शस्त्रक्रिया, प्रत्यारोपण आणि कर्करोगासारख्या रोगांवर उपचार करण्यासाठी या निधीतून मदत मिळते.

■ **एक जीवनदायी योजना–**

मुंबई सार्वजनिक विशेष अधिनियम १९५० अंतर्गत मुख्यमंत्री सहायता निधी या न्यासाची नोंदणी करण्यात आली आहे. माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र यांच्या अध्यक्षतेखाली याचे व्यवस्थापन केले जाते. मा. मुख्यमंत्री या मुख्यमंत्री सहायता निधीची एकूण देखरेख आणि नियंत्रण पाहतात.

■ **उद्दिष्टे –**

■ राज्यातील तसेच उर्वरित देशातील नैसर्गिक आपत्तींमधील आपत्तीग्रस्त व्यक्तींना मदत करणे.

■ जातीय दंगलीत मृत व्यक्तींच्या वारसदारांना तसेच ज्यांना दुखापत झालेली आहे आणि/ किंवा ज्यांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे, त्यांना आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे.

■ दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या किंवा दुखापत झालेल्या व्यक्तींच्या वारसदारांना आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे.

■ रुग्णांना उपचार आणि /किंवा शस्त्रक्रिया करण्यासाठी आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे.

■ अपघाती मरण पावलेल्या (मोटार/रेल्वे/विमान/जहाज अपघात वगळता) व्यक्तींच्या वारसांना आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे.

■ आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदतीची आवश्यकता असणाऱ्या विविध संस्थांना आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे.

■ शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक चर्चासत्रे आणि संमेलने आयोजित करण्यासाठी आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे.

■ शैक्षणिक आणि वैद्यकीय आस्थापनांच्या इमारती बांधण्याकरीता अंशत: आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे.

■ **मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून विनियोगासाठीचे उद्देश–**

विविविध आपत्तीतील आपद्ग्रस्तांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याचा प्रमुख उद्देश असला तरी,




नैसर्गिक आपत्ती व्यतिरिक्त खालील विविध बाबींकरीता निधीचा विनियोग करण्यात येत असतो. ११.नैसर्गिक आपत्ती (अतिवृष्टी, पूर व भूकंप इत्यादी.)

२. जातीय दंगल व बॉम्बस्फोट इत्यादी आपत्तीमध्ये शासनाच्या योजनेतून नियमानुसार देण्यात आलेल्या मदती व्यतिरिक्त अशा प्रकरणी मा. मुख्यमंत्री महोदंयानी अर्थसहाय्याची अनुकुलता दर्शविली असेल तर, आपदग्रस्तांना मदत होण्यासाठी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांकडे आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे.

३. रुग्णालयास वैद्यकीय शस्त्रक्रिया / उपचार घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या रुग्णांना त्यांचेवर करावा लागणाऱ्या खर्चापोटी अंशत: अर्थसहाय्य उपलब्ध करणे.

आकडेवारी काय सांगते?

जानेवारी ते जून २०२५ या काळात, या योजनेअंतर्गत २३ हजार २६९ गरीब रुग्णांना एकूण १४८ कोटी ६० लाख रुपयांची मदत देण्यात आली. यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १४ हजार ६५१ रुग्णांना १२८ कोटी ६ लाख, धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातून ८ हजार ५०७ रुग्णांना १५ कोटी २४ लाख मदत करण्यात आलेली आहे.

■ सुधारित कार्यपद्धती

या निधीच्या कार्यात अधिक सुधारणा करण्यासाठी काही नवीन बदल करण्यात आले आहेत:

■ परकीय मदतीचा मार्ग खुला: मुख्यमंत्री सहाय्यता निधीला परदेशी देणग्या स्वीकारण्याची परवानगी मिळाली आहे.

■ 'चरणसेवा' उपक्रम: वारीच्या काळात वारकऱ्यांसाठी आरोग्य सेवा पुरवण्यात आली.

■ उत्पन्न प्रमाणपत्र पडताळणी: अर्ज प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी उत्पन्नाच्या दाखल्यांची ऑनलाइन पडताळणी सुरू.

■ धर्मादाय रुग्णालयांचे परीक्षण: धर्मादाय रुग्णालयांकडून दिल्या जाणाऱ्या मोफत उपचारांची तपासणी.

**निधीची प्रक्रिया**

मुख्यमंत्री सहाय्यता निधीची प्रक्रिया अत्यंत सोपी आणि पारदर्शक आहे. यासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही.

■ उपचार सुरू असतानाच मदतीसाठी अर्ज करता येतो.

■ प्रथम महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजना किंवा धर्मादाय रुग्णालयांमध्ये संपर्क साधावा.

■ हे पर्याय उपलब्ध नसल्यास, मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळू शकते.

■ **कोणत्या आजारांचा समावेश आहे?**

या योजनेत वीस गंभीर आजारांचा समावेश आहे. ज्यात हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुस आणि हाडांचे प्रत्यारोपण, कर्करोग, अपघात, बालरोग, मेंदूविकार, हृदयविकार, डायलिसिस, जळीतग्रस्त आणि नवजात शिशुंच्या उपचारांचा समावेश आहे. उपचारांसाठी २५ हजार ते २ लाख रुपयांपर्यंतची मदत मिळू शकते.

**अर्ज कसा करावा?**

■ विहित नमुन्यातील अर्ज

■ उपचार खर्चाचे प्रमाणपत्र

■ रुग्ण दाखल असल्याचा जिओ टॅग फोटो

■ उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड, रेशन कार्ड

■ वैद्यकीय चाचणी अहवाल आणि आवश्यक कागदपत्रे

अर्ज रे.लीष–ीहर्सीं.ळप वर पाठवा आणि कागदपत्रे पोस्टाने पाठवा. अधिक माहितीसाठी ०२२–२२०२६९४८ / ९०४९७८९५६७ या क्रमांकावर संपर्क साधा किंवा cmrf.maharashtra.gov.in या वेबसाइटला भेट द्या.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे गरीब रुग्णांना केवळ आर्थिक मदतच मिळत नाही, तर त्यांना एक प्रकारचा आर्थिक आधारवड मिळत असून रुग्ण व त्याच्या कुटुंबाची आर्थिक परवड या निधीमुळे थांबली जात आहे.

**– सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर.**

# नूतन पोलीस निरीक्षक अजित चिंतले यांचा कळंब येथे सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे :कळंब पोलीस स्टेशनचे नूतन पोलीस निरीक्षक अजित चिंतले यांनी दि. १९ जुलै रोजी कळंब पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक म्हणून सूत्रे स्वीकारली कळंब पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवी सानप यांची धाराशिव जिल्हा पोलीस कार्यालय येथे ए.एच.टी.यू. विभागात बदली झाली आहे त्यांच्या जागी लोहारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अजित चिंतले यांनी कळंब पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक म्हणून सुत्रे स्वीकारली आहेत ,कळंब येथील सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील नागरिकांनी नूतन पोलीस निरीक्षक अजित चिंतले यांचा फेटा, शाल, बुके व पुष्पहार देऊन जिल्हाध्यक्ष महादेव महाराज आडसुळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, तुळजाई सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शाहाजी चव्हाण, प्राचार्य सतीश मातने, माधवसिंग राजपूत, रमेश आंबीरकर, संदीप कोकाटे व शिक्षक हरिभाऊ मोरे ,जयपाल शिंदे,यांची उपस्थिती होती. राजेंद्र बिक्कड यांनी चिंतले यांचे स्वागत केले व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या सन्मान, सुरक्षा आणि विश्वास हे मूल्य अंगीकारून आपल्या नेतृत्वात पोलीस विभाग अधिक कार्यकारील अशी अपेक्षा व्यक्त केली तर महादेव महाराज अडसूळ यांनी सदरक्षणाय ,खलनिग्रहणाय हे पोलीस विभागाचे ब्रीद वाक्य आहे यासाठी पोलीस काम करीत आहे त्यांना आपण जर वेळोवेळी सहकार्य केले तर समाजात शांतता राहते यामुळे विकास होतो असे सांगून यासाठी चांगल्या विचाराचा स्वीकार करावा व वाईट विचारा पासून दूर राहावे असे विचार व्यक्त केले पोलीस निरीक्षक अजित चिंतले यांनी याप्रसंगी बोलताना कायदा व सुव्यवस्था राखणे हे पोलिसाचे काम आहे परंतु कुठलेही चांगले काम करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज असते आपण सर्वजण मिळून कळंब शहरात काम करूया असे सांगितले.

# निफाड उपजिल्हा रुग्णालय,व तालुका आरोग्य विभागाचे वतीने डेंग्यू प्रतिरोध दिन – जनजागृती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : दर वर्षी जुलै महिन्यात डेंग्यू प्रतिरोध दीन साजरा करण्याबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निफाड तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय निफाड व तालुका आरोग्य विभाग, पंचायत समिती निफाड यांच्या संयुक्त विद्यामाने डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.या वेळी डॉ राजीव तांभाळे, वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय निफाड यांनी डेंग्यू आजाराबाबत माहिती देताना सांगितले की, डेंग्यू हा डासांमुळे पसरणारा आजार असून दरवर्षी पावसाळ्याच्या कालावधीत याचा फैलाव वाढतो. यामुळे नागरिकांमध्ये डेंग्यूविषयी जनजागृती निर्माण करून त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे यासाठी डेंग्यू प्रतिरोध दिन साजरा केला जातो. याकरिता साथरोग किटक शास्त्रीय सर्वेक्षण गावपातळीवर सर्व आरोग्य कर्मचारी व आशा वर्कर यांना करण्याबाबत आदेशित आहे.

या दिनानिमित्त तालुका आरोग्य अधिकारी डॉ सुजित कोशिरे यांनी सांगितले की,डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी पुढील उपाय अत्यावश्यक आहेत:

१. घरासमोर व आजूबाजूला पाणी साचू देऊ नये

२. पाण्याची टाकी, ड्रम, कूलर इ. झाकून ठेवावेत

३. आठवड्यातून एकदा कोरड्या दिवसाचे पालन करावे

४.संध्याकाळी व सकाळी पुर्ण बाह्य कपडे वापरावेत

५. डासांना पाय रोखण्यासाठी मच्छरदाणी, रेपलंट वापराव

डेंग्यू टाळायचा असेल तर प्रत्येकाने आपल्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवणे ही सामूहिक जबाबदारी आहे. सरकार, संस्था आणि नागरिकांनी एकत्रित प्रयत्न केल्यास डेंग्यूवर नियंत्रण मिळवणे शक्य आहे. तसेच नगरपंचायत निफाड व सर्व ग्रामपंचायत यांच्याकडून दैनदिन घनकचरा गोळा करणाऱ्या गाडीतून ध्वनीप्रक्षेपनावरून अधिकची जनजागृती करण्याकरीता उपजिल्हा रुग्णालय निफाड व निफाड तालुका आरोग्य विभाग प्रमुखांकडुन सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १२१ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिपादन

# मुला मुलींना शिक्षण द्या; परंपरागत कामात गुंतवू नका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल च्या वतीने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे मुला मुलींना शिक्षण द्या परंपरागत कामात गुंतवू नका. करिता विद्यार्थ्यांनो शूर व धैर्यशील व्हा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या दोन्ही विधानाच्या ८४ व्या व ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त १२१ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा १३ जुलै २०२५ ला आयोजित करण्यात आली होती.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपल्या अपत्यांनी आपल्यापेक्षा उच्च पदावर विराजमान व्हायची अपेक्षा बाळगून ती पूर्णत्वास नेने ही प्रगतीचे लक्षण आहे. समाजातील काही उच्चपदस्थ व्यक्ती यांनी त्यांच्या जीवनात वैयक्तिक व कौटुंबिक विकास केल्याचे पाहायला मिळते. मात्र त्यांचे सामाजिक योगदान नगण्य असते. तर मग त्यांच्या कर्तव्य व जबाबदारीच काय? हा प्रश्न मात्र अनुत्तरीत राहतो. त्यांचे उच्च शिक्षण त्यांच्याच मेंदूत सडणार असेल तर मग समाजाला काय उपयोग? कौटुंबिक व सामाजिक विभक्तपणामुळे आपल्या ऊर्जेच्या ऱ्हास होत चालला आहे. करिता सामाजिक ऐक्य फार मोलाचे आहे.

१९९१ च्या काळात सुरू करण्यात आलेल्या खाजगीकरणाच्या धोरणाने समाजाची वाट लावली की समाजाला वाट दाखविली? याचे विश्लेषण करून वंचित मूलनिवासी बहुजन समाजातील अर्थतज्ज्ञांनी तत्कालीन परिस्थितीत काय भूमिका पार पाडली? याची चिकित्सा करून उपायोजना करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अन्यथा समाजातील सामाजिक आर्थिक असमतोल कायम राहील. ज्यामुळे भारताचे संविधानात अंतर्भूत असलेल्या समतेच्या तत्वाला हरताळ फासला जाईल. दर्जेदार शिक्षणाचा विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वेटिंग फार व्हिसा व इतर साहित्याचे आकलन केले पाहिजे. ज्यातून आपल्या विकासाचे मार्ग खुले होतात. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संदेशाप्रमाणे आपण आपल्या मुला-मुलींना परंपरागत कामात न गुंतवता त्यांना उच्च दर्जाचे शिक्षण दिले पाहिजे. ज्यामुळे त्यांच्यात शूर व धैर्यशील होण्याची क्षमता विकसित होईल. करिता दर्जेदार शिक्षण आणि वर्तमानातील नवीन शैक्षणिक धोरण तसेच विविध स्तरावरील शिक्षणाची दुरावस्था या अनुषंगाने आपण सजग राहून आपली भूमिका पार पाडली पाहिजे.



उद्घाटन पर मार्गदर्शन करताना संशोधक अन्वय गायकवाड म्हणाले की, शिक्षण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अतूट नाते होते. विपरीत परिस्थितीत मार्गक्रमण करून पुढे जाने हे एक फार मोठे आव्हान असते. ते आव्हान स्वीकारून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज जीवनात आमुलाग्र बदल घडवण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ भावनिकते पोटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्वीकारून चालणार नाही तर त्यांना वैचारिक दृष्टीने समजून घ्यावे लागेल.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना एडवोकेट राजू बागुल म्हणाले की, सर्व विद्यार्थ्यांचे व्यापक प्रमाणात हित लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुला मुलींना परंपरागत कामात गुंतवण्यापेक्षा शिक्षण दिले पाहिजे असा संदेश दिला होता. अर्थतज्ञ नरेंद्र जाधव यांच्या परिवारातील अपत्ये समाज परिवर्तनात कुठे आहेत? मुख्य प्रवाहापासून ते दूर का आहेत? कोणतेही कार्य पूर्णत्वास नेत असताना सहनशीलता बाळगली पाहिजे. करिता आपण दर्जेदार शिक्षण प्राप्त केले पाहिजे. पहिल्या टॉप टेन मध्ये भारतातील कुठलीही शिक्षण संस्था किंवा विद्यापीठ नाही. तर मग आपण या संस्थातून कुठल्या दर्जाचे शिक्षण देत आहोत? याची पण सहानिशा झाली पाहिजे. एमपीएससी यूपीएससीला पर्याय शोधून जागतिक स्पर्धेत आपण उतरले पाहिजे.

याप्रसंगी महादेव डांबरे म्हणाले की, एकी हेच बळ आहे, एकीने लढल्यास यश निश्चित आहे. म्हणून आपण वैचारिक दृष्टीने एकत्रित लढा दिला पाहिजे. दररोजच्या जीवनात अन्याय अत्याचार वाढत असताना बहुजन हिताय बहुजन सुखाय' ही संकल्पना कशी साकार होईल? प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, अर्थतज्ञ नरेंद्र जाधव यांनी लिहिलेल्या साहित्यानुसार त्यांनी आपल्या कुटुंबातील अपत्यांना परदेशीय शिक्षण देऊन परदेशात स्थायिक केले आहे. त्याचा आपण आदर्श घेतला पाहिजे. त्यांनी हे मान्य केला आहे की, त्यांना त्यांच्या आई-वडिलांनी जन्म दिला असला तरी जीवनाला आकार देण्याचे काम मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने झाले आहे. काळाराम मंदिरापासून तर धर्मांतरापर्यंत जाधव कुटुंब बाबासाहेबांच्या चळवळीत कार्यरत होते. भूतकाळातील अडाणी लोकांना बाबासाहेब कळाले होते परंतु वर्तमानात शिकल्या सवरलेल्यांना सुद्धा बाबासाहेब कळाले नाही, असे म्हणण्याची वेळ आली आहे. यापुढे यूजीसी नेट असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच पीएचडी करण्याची संधी दिली जाणार आहे. अशाप्रकारे बहुजन विद्यार्थ्यांना संधी नाकारली जाणार आहे. इंजिनीयर किशोर पाटील म्हणाले की, आपल्या समाजास गलिच्छ कामे करण्यास भाग पाडले जात असल्याने त्यांच्या अपत्यांनी अशा परंपरागत कामात गुंतवून न ठेवता आपल्या मुला-मुलींना दर्जेदार शिक्षण दिले पाहिजे असे बाबासाहेब म्हणाले होते. उद्योजक मिलिंद बागुल म्हणाले की, आपल्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळून सामाजिक कार्य केले पाहिजे. गटारात उतरून गलिच्छ कामे करणारी माणसं आपलीच असतात. करिता आता आपण परंपरागत गलिच्छ कामे सोडली पाहिजेत.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक एडवोकेट विलास रामटेके यांनी तर आभार महादेव डांबरे यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला एड. विलास रामटेके, बी. बी. मेश्राम, एड. इंजिनीयर किशोर पाटील, अन्वय गायकवाड, महादेव डांबरे, साधू आनंद, प्रा. शिवम गायकवाड, उद्योजक मिलिंद बागुल, एड. सचिन आगरकर इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पडघा टोलनाक्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी बोलावली बैठक

## माजी खासदार राजन विचारेनी महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांना सुनावले खडेबोल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : पडघा - मुंबई नाशिक महामार्गावर भिवंडी तालुक्यातील वडपे ते नाशिक जिल्ह्यातील गोंदे यादरम्यान चौपदरीकरणाचे काम पंधरा वर्षांपूर्वी पूर्ण झालेले आहे मात्र सदर मार्गावर अनेक ठिकाणी सेवा रस्ते तसेच आजूबाजूच्या गावांकरिता देण्यात येणारे भुयारीमार्गांची कामे प्रलंबित असल्याने गुरुवारी शिवसेना ठाकरे गट व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने टोलनाक्यावर धडक मोर्चा नेऊन टोलनाका बंद पाडला होता. या प्रकरणाची ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी गंभीर दखल घेत तात्काळ महामार्ग प्राधिकरण टोल नाका कंपनी, पोलीस प्रशासन आंदोलक तसेच शिवसेनेचे माजी खासदार राजन विचारे यांच्या समवेत बैठक घेतली.



यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व बाजू ऐकून घेत महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक श्रीकांत ढगे यांना तात्काळ महामार्गाची प्रलंबित कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. सुरुवातीला जिल्हाधिकारी शिनगारे यांनी शिवसेना ठाकरे गट उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे, मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष डि.के. म्हात्रे, शैलेश बिडवी, विकास जाधव, महेश राऊत, रवींद्र विशे, मदन पाटील व इतर मोर्चेकरांची बाजू ऐकून घेत प्रकल्प संचालक ढगे यांचे म्हणणे ऐकले यावेळी महामार्ग प्राधिकरण तसेच टोल नाका वसुली कंपनीच्या अधिकाऱ्यांचा प्रलंबित कामे पूर्ण करण्यात ढिसाळपणा होत असल्याचे लक्षात आल्याने तातडीने या महामार्गाची पुन्हा एकदा पाहणी करून कुठे ,कुठे प्रलंबित कामे राहिली आहेत तसेच प्रस्तावित कामे करणे आवश्यक आहे याचा अहवाल मंगळवार पर्यंत आपल्या कार्यालयाकडे जमा करावा असे स्पष्ट आदेश देत जनभावनेचा उद्रेक होण्याची शक्यता ही असल्याने या प्रकरणाकडे गांभीर्याने बघून तात्काळ कामे सुरू करावी असे आदेश जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले आहेत.

जवळपास दीड तास चाललेल्या या बैठकीत सुरुवातीपासूनच ऐकून घेण्याच्या मनस्थितीत असलेले शिवसेना ठाकरे गटाचे माजी खासदार राजन विचारे यांनी सर्व बाजू ऐकून घेतल्या यात महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यां कडून थातूरमातूर उत्तरे दिले जात असल्याचे लक्षात आल्याने विचारे यांनी प्रकल्प संचालक श्रीकांत ढगे यांना चांगलेच खडसावले. महामार्गावर प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण न केल्यास टोलनाकाच कायमस्वरूपी बंद पडणार असल्याचे यावेळी सांगितले. याबैठकीकरिता जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक स्वामी, विभागीय पोलीस अधिकारी राहुल झाल्टे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सुरेश मनोरे, तसेच महामार्ग प्राधिकरण व टोलनाका कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

# आंबेडकर चळवळीचे परमेश्वर गुमते यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट : तालुक्यातील किरनळी गावचे रहिवासी आणि गेल्या ४० वर्षापासून आंबेडकर चळवळीमध्ये सक्रिय काम करणारे परमेश्वर गुमते यांचा काल सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले. जातीने लिंगायत समाजात जन्मले असताना बहुजन चळवळीत काम करत असताना गोरगरीब लोकांना न्यायासाठी अनेक लढा उभा केले अनेक गोरगरिबांना आर्थिक मदत शैक्षणिक साठी मुलांना शालेय साहित्य मदत असे लोक उपयोगी काम कायम करत असायचे त्याचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे पुढे कोणीही दिसलं तरी जय भीम केल्याशिवाय सोडत नव्हते.

त्यांच्या पाश्चात एक मुलगा तीन मुली आणि पत्नी भाऊ असा मोठा परिवार आहे.

अक्कलकोट तालुक्यातील किरनळी या गावात जन्मलेले परमेश्वर गुमते हे शालेय आणि माध्यमिक शिक्षण घेत असतानाच आंबेडकर चळवळीत काम करण्यास सुरुवात केली .. दलित पँथर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया बहुजन भिमसेना या विविध पक्ष आणि संघटनाच्या माध्यमातून अक्कलकोट तालुका आणि सोलापूर जिल्ह्यात विविध ठिकाणी होत असलेल्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात काम केलं आहे.. शिरवळ मध्ये झालेल्या दंगलीमध्ये पेटून उठून दलितावर झालेल्या अत्याचार विरोधात आंदोलन पुकारून आवाज उठून अत्याचार करणाऱ्या आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यास भाग पाडल होत यासह अक्कलकोट तालुका आणि जिल्ह्यांमध्ये ज्या ज्या ठिकाणी दलितावर अन्या त्याच्यावर होत असे त्या ठिकाणी परमेश्वर गुमते धावून त्यांच्या मदतीसाठी जात.. अक्कलकोट तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यातील अनेक गोरगरीब रुग्णांना परमेश्वर गुमते हे शासकीय योजनेच्या माध्यमातून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार करण्यासाठी मदत करत गुमते यांना सोलापूर जिल्ह्यात सध्या रुग्णदूत म्हणून ओळखले जात होतं.

गेल्या अनेक वर्षापासून परमेश्वर गुमते हे दिवाळीमध्ये गोरगरिबांसाठी फराळ आणि शिधा वाटप करण्याचं काम करत होते.. गावच्या यात्रेमध्ये परमेश्वर गुमते हे दरवर्षी गोरगरीब नागरिकांना साडी वाटप त्यास विविध जीवनावश्यक वस्तूचे वाटप करत असे गुमते यांच्या जाण्याने आंबेडकर चळवळीत मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

काल संध्याकाळी त्याच्या मूळ गावी किरणळी येथे अत्यविधी करण्यात आले यावेळी मोठया संख्येने जन समुदाय अत्यविधी साठी सहभाग घेतले होते.

# अवकाळी पावसाने झालेले नुकसानीचे भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार : आ. नारायण आबा पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा तालुक्यातील अवकाळी पावसाने झालेले नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे.

८३ लाख रुपये मिळावेत अशी मागणी होती. त्यानुसार तालुक्यातील एकूण ८८ ३० शेतकऱ्यांना त्यांचा एकूण ७२ २७ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २३ कोटी २२ लाख रुपये नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली संबंधित विभागाकडून तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयात सादर झाला. गरड झडी साठी एक कोटी २७ लाख रुपये मिळाले जाणार आहे तर १२ लाभार्थ्यांना दगावलेल्या जनावरांच्या मोबदल्यात पैसे दिले



जातील यातील काही जणांच्या खात्यावर रकमा जमा करण्यात आली तर उर्वरित शेतकऱ्यांना शासनाकडून पुढील रकमेचा हप्ता मंजूर होतात खात्यावर जमा करण्यात येईल असे करमाळा तालुक्याचे आमदार नारायण आबा पाटील यांनी सांगितले.

# चंद्रभागा वाळवंट परिसरात स्वच्छता मोहिम; पंढरपुर शहर पोलीस व आर्ट ऑफ लिव्हींगचे साधक यांच्याकडून स्वच्छता मोहीम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रा मुख्य सोहळा ०६ जुलै २०२५ रोजी संपन्न झाला. यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी पंढरपूर शहरात लाखोंच्या संख्येने भाविक आले होते. यात्रा कालावधीत चंद्रभागा वाळवंट परिसरातही भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. येणाऱ्या भाविकांसाठी चंद्रभागा वाळवंट परिसर स्वच्छ असावा यासाठी पंढरपूर शहर पोलीस अधिकारी -कर्मचारी व आर्ट ऑफ लिव्हिंगचे महिला व पुरुष साधक तसेच नगरपालिका अधिकारी कर्मचारी यांच्याकडून चंद्रभागा वाळवंटपरिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

यात्रा कालावधीत वाळवंट परिसरात भाविकांची गर्दी मोठया प्रमाणात होत असल्याने सदर परिसरात सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी याकरिता जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या सुचनेनुसार उपविभागीय पोलीस अधिकारी




डॉ अर्जुन भोसले, तसेच पंढरपुर शहर पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक २० जुलै २०२५ रोजी वाळवंट परिसरात आर्ट ऑफ लिव्हींग धाराशिव संस्थेचे नंदु भैय्या तांबडे तसेच पुरुष व महिला साधक त्याचबरोबर पंढरपुर नगरपालिकाचे अधिकारी व कर्मचारी यांनी एकत्रित येवुन वाळवंट परिसरातील मोठया प्रमाणात कचरा गोळा करून स्वच्छता मोहिम राबविली.




# स्वेरीज् डी.फार्मसीच्या निकालाची उज्ज्वल परंपरा कायम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरः गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित डिप्लोमा फार्मसी कॉलेजचा प्रथम व द्वितीय वर्षाचा निकाल अलीकडेच घोषित झाला आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (एम.एस. बी. टी.ई.) ने जाहीर केलेल्या निकालात स्वेरी संचलित डी.फार्मसी (पॉलि.) च्या समृद्धी दीक्षित यांनी प्रथम वर्ष डी.फार्मसीमध्ये तर अर्चना वाघ यांनी द्वितीय वर्ष डी. फार्मसी मध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे.

**प्रथम वर्षात समृद्धी दीक्षित प्रथम तर द्वितीय वर्षात अर्चना वाघ प्रथम**

पंढरपूर परिसरातील विद्यार्थ्यांना डिप्लोमा फार्मसीच्या शिक्षणासाठी मुंबई, पुणे, सांगली, सोलापूर अशा मोठया शहरात जावे लागत होते. विद्यार्थ्यांची होणारी ही गैरसोय पाहून व त्याचबरोबर संस्थेच्या शिक्षण क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे संस्थेचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांनी पंढरपूर पंचक्रोशीतील नागरिकांच्या फार्मसीकरीता केलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर डी.फार्मसी कॉलेजची स्थापना केली. डी. फार्मसीचे यंदाचे हे १९ वे वर्ष आहे. डी. फार्मसीमध्ये विद्यार्थ्यांनी शैक्षणिक निकालात यशाची परंपरा कायम राखल्यामुळे यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या प्रथम वर्ष डिप्लोमा फार्मसी परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक समृद्धी सतीश दीक्षित (८७.२० टक्के), द्वितीय क्रमांक शोभा सुरेश मासाळ (८४.२० टक्के), तृतीय क्रमांक प्रतिभा दिलीप मिसाळ (८३.१० टक्के) यांनी मिळविला. तर द्वितीय वर्ष डिप्लोमा फार्मसीमध्ये अनुक्रमे प्रथम क्रमांक अर्चना महादेव वाघ (८६.६४ टक्के), द्वितीय क्रमांक प्रणिता सुरेश खरात (८६.१८ टक्के), तृतीय क्रमांक धनाली अनिल बरकडे (८५.९१ टक्के) यांनी मिळवला. दोन्ही वर्षातील यशस्वी विद्यार्थ्याना प्राचार्य प्रा. सतिश मांडवे यांच्यासह प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन केले आहे.

**'महाराष्ट्र वारकरी किर्तनकार गोलमेज परिषदे' चा समारोप**

**पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांचे विचार**

# अध्यात्म व विज्ञानाच्या विचारांचा समन्वय म्हणजे 'नवा भारत'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे, २० जुलैः विज्ञान व अध्यात्माच्या एकत्रीकरणातून नव्या विचारांचा समन्वय होईल, आणि या दोन्हीच्या विचारांचा समन्वय म्हणजे नवा भारत असेल. पंतप्रधान सतत म्हणतात की भारत एक महान व चांगले राष्ट्र होणार आहे. याची सुरूवात 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदे'तून झाली आहे. भारतीय राजकारणाला बदलावयाचे असेल तर अध्यात्मिक विचार मांडले गेले पाहिजे. येथून निघालेले मंथन हे भारतीय संस्कृतीला नवी दिशा देण्यासाठी सज्ज आहे. असे विचार जागतिक किर्तीचे संगणक तज्ज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केले.

'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ एज्युकेशन, पुणे' व 'एमआयटी-राष्ट्रीय सरपंच संसद' यांच्या संयुक्त विद्यमाने हनुमानवाडी आळंदी (देवाची) येथील डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल येथे आयोजित दोन दिवसीय 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदे' च्या समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

या प्रसंगी पंढरपूर येथील श्री-गुरू साखरे महाराज परंपरा पाईकचे हभप रामकृष्ण महाराज वीर, आळंदी येथील साधकाश्रमचे प्रमुख हभप यशोधन महाराज साखरे, बदलापूर येथील ज्येष्ठ कीर्तनकार हभप विश्वनाथ महाराज वारिंगे, देहूचे हभप पांडुरंग महाराज घुले, पंडित उद्धवबापू आपेगावकर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड होते. तसेच




पद्मश्री पोपटराव पवार व परिषदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील उपस्थित होते.

डॉ. विजय भटकर म्हणाले, राजकारणाला अध्यात्मिक कल कसा मिळू शकेल यावर महात्मा गांधीजी सतत विचार मांडत होते. पण या परिषदेच्या माध्यमातून यांची सुरूवात झाली आहे. येथील राजकारणाला आध्यात्मिक कसे करता येईल हे सर्वात मोठे परिवर्तन असेल. राजकारणाला स्वच्छ करण्यासाठी अशा प्रकारच्या गोलमेज परिषदेचे आयोजन होणे अत्यंत गरजेचे आहे. भारताला स्वातंत्र्य कसे आणि कोणत्या पद्धतीने मिळावे या साठी ब्रिटीशकाळात गोलमेज परिषदेला अतिशय महत्व आले होते. ही परिषद लंडन ला भरणार होती आणि येथे हे विचार मांडले जाणार होते. त्याच प्रमाणे ही परिषद देशासाठी अत्यंत महत्वाची आहे.

डॉ. सदानंद मोरे म्हणाले, समाजात प्रबोधनाचे सामर्थ्यशाली माध्यम कीर्तन आहे. कीर्तनकार प्रबोधनाच्या माध्यमातून सर्व जातीचे कांगोरे कमी करण्याचे प्रयत्न करीत असतो. या परिषदेत वारकरी शिक्षण संस्थेबद्दल जी चर्चा झाली त्यानुसार आता त्यांना व्यावसायिक कार्याचे प्रशिक्षण देणे काळाची गरज आहे. वारकरी संप्रदायात शिस्तबद्ध आणि ज्यांना व्हिजन आहे अश्या लोकांची खूप गरज आहे. या संप्रदायाने आता मिशन ठेऊन मार्गावर चालावे.

डॉ. राहुल विश्वनाथ कराड म्हणाले, ऐतिहासिक परिषदेतून असे सरपंच आणि महाराज तयार व्हावे जेणे करून देशात परिवर्तनाची लाट आली पाहिजे. जीथे अध्यात्माचा बेस असतो तेथे विकास असतोच. त्याच प्रकारे राजकारणात चारित्र्यवान लोक निर्माण करण्यासाठी भारतातील पहिली एसओजी संस्थेची निर्मिती केली आहे. आज याच माध्यमातून राज्यात दोन आमदार व देशात ८ आमदार निवडून आले आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी नव नवीन प्रयोग सातत्याने राबविले जात आहे.

यशोधन महाराज सारखे म्हणाले, वारकरी संप्रदाय हा परोपकारी संप्रदाय आहे. कीर्तनकारांनी आपल्या आचरणातून आदर्श निर्माण करावा. या परिषदेतून समोर आलेल्या वेगवेगळ्या समस्यांच्या समाधानांचे निराकरण करण्यासाठी संतांनी सांगितलेल्या विचारांवर विचार विमर्श करावा लागेल. तसेच सामाजिक समस्यांसाठी वारकरी संप्रदायाने विचार करावा.

यानंतर हभप रामकृष्ण महाराज वीर महाराज आणि विश्वनाथ महाराज वारिंगे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, समाजाला खरी दिशा देण्याचे कार्य केवळ वारकरी संप्रदाय आणि सरपंच करू शकतात. वारकरी संप्रदाय हा विश्वधर्मी असून स्वामी विवेकानंदाच्या स्वप्नातील भारत निर्मितीच्या कार्यात अनमोल वाटा असेल. कल्याणाची आणि विकासाची मुळ कल्पना घेऊन वारकरी संप्रदायाने मानवी मूल्यांचे मुळ तत्व धरून कार्य करीत आहेत.

सूत्रसंचालन डॉ. शलिनी टोणपे यांनी केले. योगेश पाटील यांनी आभार मानले.

# अक्कलकोट येथील भीमनगर विविध समस्यांच्या विळख्यात

## विविध समस्यांबाबत नगरपरिषदेला वंचितकडून निवेदन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/प्रतिनिधी

ड्रेनेज पाईपच्या नावाखाली भीम नगर खड्डामई झालेला आहे, चिखलमय झालेला आहे,

लक्ष देताल का सी ओ साहेब! असे म्हणत वंचित बहुजन आघाडी च्या वतीने मुख्याधिकारी यांना घेरले.

विनोद मडीखांबे यांच्या घरापासून ते कल्याणी घाटगे यांच्या घरापर्यंत ड्रेनेज पाईप साठी खड्डा खोदून दोन महिने उलटले तरीही तिथलं काम कॉंक्रेट रस्त्याचा काम अजून झालेला नाही तिथे खड्डे आणि चिखल अत्यंत मोठ्या प्रमाणात झालेला आहे. भीमा घाटगे व जीवन मडीखांबे यांच्या घरापासून ते समाज मंदिर पर्यंत ड्रेनेज पाईप साठी खड्डा खोदून पाईप टाकले दोन महिने झाले अजूनही कॉंक्रिटीकरण झालेलं नाही. समाज मंदिर ते सरळ स्वप्निल गायकवाड च्या घरासमोरून मैंदर्गी रोडला जोडलेला रस्ता संपूर्ण ड्रेनेज पाईप साठी खोदलेला असून अद्यापिक कॉंक्रिटीकरण झालेला नाही. श्रीकांत मडीखांबे यांच्या घरापासून ते संदीप गायकवाड यांच्या घरापर्यंत मोठ्या प्रमाणात खड्डा खोदलेला असून ड्रेनेज पाईप त्या ठिकाणी घातलेले आहेत दोन महिन्याचा कालावधी उलटला अद्यापही कॉंक्रिटीकरण झालेला नाही.

चनबस बनसोडे यांच्या घरापासून ते बुद्धविहाराकडे शेवटपर्यंत खड्डा खादलेला असून ट्रेनच्या पाईप टाकलेले आहेत परंतु अद्यापिक कॉंक्रेट झालेला नाही, स्वामी मडीखांबे प्लंबर यांच्या घरापासून ते दशरथ मढी खांबे यांच्या घराच्या पाठीमागच्या बाजू ला संपूर्ण रस्ता खोदलेला असून ड्रेनेज पाईप टाकलेला असून अध्यापिक कॉंक्रीट करून झालेलं नाही, भीम नगरच्या पाठीमागच्या बाजूला मोठी पाण्याची टाकी झालेली आहे त्याच्याच बाजूला सार्वजनिक शौचालय आहे पुरुषांसाठी आणि महिलांसाठी भीम नगर मध्ये इतक्या मोठ्या वस्तीमध्ये दोन शौचालय आहे एक मैंदर्गी रोडला दुसरा पाण्याच्या टाकीच्या बाजूला या दोन्ही शौचालय याला दरवाजे नाही ,स्वच्छता ,नाही, परशा फुटलेले आहेत, सगळीकडे झाडं झुडपे वाढलेले आहेत साप किड्या मुंग्यांची भीती आहे, अत्यंत घाणेरडे अवस्था या शौचालयाची झालेली असून या शौचालय ची दुरुस्ती स्वच्छता आणि वरील जे सहा मुद्दे आहेत त्या सहा मुद्द्याचे कॉंक्रिटीकरण जर आठ दिवसात नाही झाला .

भीम नगर मध्ये अमित बनसोडे व उदय सोनकांबळे यांच्या घराच्या बाजूला एका अतिशय सुंदर असं वास्तू समाज मंदिर आहे. त्या समाज मंदिर मध्ये छोटे छोटे कार्यक्रम पूर्वी होत असत, पावसाळ्यात गोरगरिबांना आडोसा होता, परंतु आता सध्याला त्याची इतकी भयानक दुरावस्था झालेली आहे ती दुरुस्ती करून मिळावी अतिशय सुंदर असा बांधकाम त्या ठिकाणी झालेला असून फक्त दुरुस्तीची गरज आहे . फरशीकरण दार कलर वर कोबा असे जर या वास्तूला पण केला तर तो अजूनही शोभून दिसेल किंवा छोटे-मोठे कार्यक्रम त्या ठिकाणी होतील आणि महत्त्वाचं म्हणजे सर्व निवडणुकीचे बूथ सुद्धा तोच समाज मंदिर आहे माननीय तहसीलदार साहेबांना याची विनंती केली होती की आपण या बूथ ची दुरुस्ती करावी पण अद्यापही त्याकडे दुर्लक्षित झालेला आहे. वरील सर्व मुद्दे आपण नीट व्यवस्थित लक्षात घेऊन येणाऱ्या आठ ते दहा दिवसांमध्ये या सर्व कामाला सुरुवात करावी.

जर कामाला सुरुवात झाली नाही तर तर वंचित बहुजन आघाडी अक्कलकोट शहर व तालुक्याच्या वतीने बेमुदत अर्धनग्न आंदोलन आणि सोबत आपल्याला जागृत करण्यासाठी हलगी नाद आंदोलन करण्यात येईल याची दखल घ्यावी कायदा व सुव्यवस्था निर्माण झाल्यास याला सर्वस्वी आपण जबाबदार रहाल याची आपण नोंद घ्यावी. यावेळी वंचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मढी खांबे युवक तालुका अध्यक्ष शिलामणी बनसोडे, शहराध्यक्ष विशाल ठोंबरे, युवक जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश शिंदे, किरण किरण अंबादास बनसोडे, ज्ञानेश्वर दसाडे सुनील शिंगे, शहर उपाध्यक्ष संतोष घाडगे, सिद्धार्थ बनसोडे, सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रवी पोटे, माणिक गायकवाड, संदीप गजदाने, सचिन गजदाणे, मल्लिनाथ पाटील शौकत मुजावर, तालुका महासचिव नागेश हरवाळकर हनुमंत गोसावी आणि कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# पोलीस अधीक्षक लातूर यांना युवा भीमसेनेतर्फे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
लातूर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : दि.२० जुलै २०२५ रोजी झालेल्या अमानुष मारहाण प्रकरणातील त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी अशा प्रकारचे निवेदन युवा भीम सेने तर्फे पोलिस अधीक्षक लातूर यांना देण्यात आले आहे.



तसेच महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, हे ही मंडळाच्या पावसाळी अधिवेशन सुरू असताना सभाग्रहामध्ये ऑनलाइन रमी खेळत बसणे ही शेतकरी व महाराष्ट्राच्या राजकारणासाठी हिताची बाब आहे का? हा सर्वात मोठा धोका जनतेसमोर उभा आहे.

विधिमंडळ हे जुगार खेळायचे ठिकाण नाही त्याच बरोबर काल दि.२०जुलै २०२५ रोजी, मा. सुनील तटकरे हे लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना लातूर येथील छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी निषेधाचे पत्र दिले, तसेच जुगाराचे पत्ते त्यांना देऊन सांगितले की की हे कृषी मंत्र्यांना द्या म्हणून, अत्यंत शांत पद्धतीने केलेले आंदोलनाला उग्ररूप देण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या कार्यकर्त्याकडून करण्यात आला आहे. यात छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना अमानुष मारहाण करण्यात आली ही लातूरच्या समाजकारणाला व राजकारणाला लाजिरवाणी बाब आहे, माननीय जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणात ज्या लोकांनी अमानुष मारहाण केली अशा गुन्हेगारास तात्काळ अटक करून कठोर शिक्षा करण्यात यावी असे ह्या निवेदनाद्वारे सांगण्यात आले. सध्या लातूर जिल्ह्यातील वाढत्या घटना पाहता माननीय पोलीस अधीक्षक साहेबांनी संबंधित घटनेमध्ये जातीने लक्ष घालून आरोपीवर तात्काळ गुन्हा दाखल करावी या कालच्या प्रकरणामुळे लातूर येथील जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे त्यामुळे युवा भीमसेनेकडून आम्ही कृत्याचा जाहीर निषेध व्यक्त करतो.

यावेळी संस्थापक अध्यक्ष पंकज भाऊ काटे, प्रदेशाध्यक्ष कुमार कांबळे, प्रवक्ते सुपी सय्यद शमशुद्दीन महेबूब भाई, युवा जिल्हाध्यक्ष शेखर कांबळे, विशाल भोसले, शिरीष मांदळे, रत्नदीप रायभोळे, सिद्धार्थ गवळी आदी मान्यवर उपस्थित होते.

# वागदरी येथे भाग्यवंती देवी प्रकट दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/प्रतिनिधी : वागदरी तालुका अक्कलकोट येथील जागृत व नवसाला पावणारी श्री भाग्यवंती देवी प्रकट दिनानिमित्त सालाबादाप्रमाणे यावर्षीही धार्मिक सांस्कृतिक सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला आहे.



सालाबादाप्रमाणे बुधवार दिनांक २३ जुलै २०२५ रोजी भजन कीर्तन भारुड यासारख्या लोकसंगीताच्या कार्यक्रमाने जागरण कार्यक्रम गुरुवार दिनांक २४ जुलै रोजी पहाटे पाच वाजता श्री भाग्यवंती देवी मूर्तीस महारुद्राभिषेक त्यानंतर विविध धार्मिक कार्यक्रम मान्यवरांचे आगमन होईल त्यानंतर दुपारी एक वाजता महाराष्ट्र कर्नाटक मराठवाडा सह पंचक्रोशीतील हजारो भक्तगणांच्या उपस्थितीत श्री म.नी. प्र. शिवलिंगेश्वर महास्वामी विरक्त मठ वागदरी यांच्या अमृत हस्ते व आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे शिवसेना जिल्हाध्यक्ष मनीष काळजे यांच्या उपस्थितीत भव्य दिव्य नयन रम्य असा भाग्यवंती देवी पाळणा कार्यक्रम संपन्न होणार असल्याची माहिती देवस्थान अध्यक्ष काशिनाथ पोमाजी यांनी सांगितले

### सागर दादा कल्याण शेट्टी युवा मंच वतीने मोफत वाहन सुविधा

यंदा पाळण्याचा मान प्रियंका अर्जुन बोळकोटे यांना मिळाला आहे. उपस्थित सर्व भक्त जणांना महाप्रसादाची सोय करण्यात आला आहे. तरी पंचक्रोशीतील सर्व सदभक्तांनी श्री भाग्यवंती देवीच्या दर्शनाची व महाप्रसादाची लाभ घ्यावा अशी विनंती श्री भाग्यवंती देवी चारिटेबल ट्रस्ट वागदरी व समस्त ग्रामस्थ वागदरी कडून करण्यात आला आहे.

### सागर दादा कल्याण शेट्टी युवा मंच वतीने मोफत वाहन सुविधा

**दि. २४ जुलै रोजी वागदरी ते भाग्यवंती मंदिर व भाग्यवंती देवी मंदिर ते वागदरी असा मोफत प्रवास सागर कल्याणशेट्टी युवा मंच वागदरी चे अध्यक्ष श्याम बाबर यांच्याकडून भक्तांना मोफत प्रवासाची सोय उपलब्ध करून देण्यात आला आहे.**

# शेतकऱ्याचे प्रश्न सोडवण्यासाठी निवडून दिलं... रमी खेळायला नाही! - गजानन वायाळ यांचा कृषिमंत्र्यावर हल्लाबोल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :

शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी तुम्हाला निवडून दिलं आहे,रमी खेळायला नाही! अशा संतप्त शब्दांत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शरद पवार गटाचे बुलडाणा जिल्हा उपाध्यक्ष गजानन वायाळ यांनी कृषिमंत्र्यांवर जोरदार टीका केली आहे.गेल्या काही दिवसांत चिखली तालुक्यात हुमणी अळीने मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान केले असून शेतकरी प्रचंड अडचणीत सापडले आहेत.तरीदेखील कृषिमंत्री यांच्या स्तरावरून कोणतीही ठोस मदत किंवा उपाययोजना न झाल्याने वायाळ यांनी रोष व्यक्त केला आहे.



वसाड गावातील वादग्रस्त विधानावरून नाराजी

गजानन वायाळ यांनी मागील काही दिवसांपूर्वी वसाड गावची पाटीलकी अस एका कार्यक्रमात शेतकऱ्याविषयी बोलताना कृषिमंत्र्यांनी केलेल्या कथित वादग्रस्त विधानाचा देखील तीव्र निषेध केला आहे. शेतकऱ्यांच्या जिवावर उदार होऊन मंत्रीपद गाजवणाऱ्या व्यक्तींनी असा हलगर्जीपणा करणं अत्यंत लाजिरवाणं आहे, अशी टीका त्यांनी केली.

'रमी' खेळण्यापेक्षा शेतकऱ्यांना मदत करा - वायाळ यांचा सल्ला

तालुक्यात आणि संपूर्ण जिल्ह्यात हुमणी अळीने प्रचंड थैमान घातले असताना, कृषिमंत्री मात्र रमी खेळण्यात व्यग्र आहेत. शेतकऱ्याला त्वरित मदत देणं आणि पंचनामे पूर्ण करून नुकसान भरपाई मिळवून देणं हेच तुमचं काम आहे. शेतकऱ्यांची थट्टा थांबवा, असा खरमरीत सल्ला देखील वायाळ यांनी दिला.

# अखिल भारतीय छावा संघटना पंढरपूर शहर व तालुका यांच्यावतीने सूरज चव्हाणचा तीव्र शब्दात जाहीर निषेध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : अखिल भारतीय छावासंघटनेचे प्रदेशाध्यक्ष व शेतकऱ्यांचा मुलगा मा. विजय कुमार घाडगे पाटील यांना काल राष्ट्रवादीचे अजित पवार या गटाचे सुरज चव्हाण यांनी अमानुष मारहाण केली व शेतकऱ्यांच्या पोरावर हात उचललेला व शेतकऱ्यांचा व सामाजिक संघटनेचा अहवाल दाबण्याने प्रयत्न केला त्यामुळे आज अखिल भारतीय छावासंघटना पंढरपूर शहर तालुका यांच्यावतीने पंढरपूर शहरांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौकात या सुरत चव्हाण चा तीव्र शब्दात जाहीर निषेध करण्यात आला यावेळी नालायक सरकारच्या विरोधात व निष्क्रिय महाराष्ट्राची कृषिमंत्री संसद भावनात रमी गेम खेळताना सापडले अशा निर्ज्य कृषी मंत्र्यांचा निषेध यावेळेस तीव्र शब्दात करण्यात आला.

यावेळी छावा चे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होत.

**शासनाला दिलेल्या शब्दाचा विसर; प्रशासनाने वेळीच उपोषणाची दखल घेण्याची गरज**

**माझ्यावर बलिदानाची वेळ येऊ देऊ नका : स्वाती नागरे**

# ...अखेर स्वाती नागरे यांचे अन्नत्याग आमरण उपोषण सुरु




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क
राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

देऊळगाव राजा तालुक्यातील शिवनी आरमाळ येथे दिनांक २१ जुलै २०२५ पासुन स्व.कैलासभाऊ नागरे यांच्या प्रतिमेला पुजन करून श्रीमती स्वाती नागरे यांनी अन्नत्याग उपोषण सुरू करण्यात आले.आज माझ्यावर उपोषण करण्याची वेळ केवळ प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे आली पण सरकारला हात जोडून विनंती माझ्यावर बलिदान द्यायची वेळ येऊ देऊ नका फक्त माझ्या मुलासाठी मला न्याय द्या, स्वर्गीय कैलास नागरे यांनी शेतीला पाणी मिळावे म्हणून शिवनी आरमाळ येथे धरण क्षेत्रामध्ये सहा दिवस अन्नत्याग आमरण उपोषण केले होते.पण त्यांच्या उपोषणाची व निवेदनाची दखल प्रशासनाने व्यवस्थितपणे न घेतल्यामुळे हातबल होऊन न्याय मिळत नसल्याने अखेर शेवटी कैलास नागरे यांनी पाणी मिळावे म्हणून बलिदान दिले त्या बलिदानाच्या वेळेस लिहून ठेवलेल्या सुसाईड नोटमध्ये काही प्रामुख्याने धक्कादायक माहिती समोर आली. त्यामध्ये १४ गावांना खडकपूर्णा प्रकल्पाचे पाणी द्या.माझ्या मुलांना व राज्य सरकारने दत्तक घेऊन त्यांना आधार द्या अशा अनेक मागण्या त्यामध्ये करण्यात आल्या होत्या कुठल्याच प्रकारे राज्य सरकारकडून त्यावेळेस दखल घेत जात नव्हती म्हणून संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील पत्रकार बंधूंनी आवाज उठवला आणि शेतकरी नेत्यांनी आणि सर्वच राजकीय विभागांमध्ये सरकार विरोधात असंतोष दिसू लागला म्हणून त्याच अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री साहेबांनी विधानसभेमध्ये ऑन रेकॉर्ड जाहीर केले होते की मुलांचे शिक्षणासाठी दत्तक घेऊन त्यांचा शिक्षणाचा सर्व खर्च राज्य सरकार करेल पण नुसती हवेतच घोषणा झाली. माननीय मुख्यमंत्री साहेबांनी घोषणा केल्यानंतर चार महिने पूर्ण झाले तरी त्या कुटुंबाला कुठल्याच प्रकारे न्याय मिळाला नाही श्रीमती स्वाती नागरे यांनी अखेर अन्नत्याग आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला. अनेक वेळा तहसील कार्यालय मान्य तहसीलदार साहेबांशी भेट घेऊन व फोनवर चर्चा करून सुद्धा काहीच निष्पन्न झाले नाही म्हणून निवेदन देऊन निवेदनामध्ये अनेक धक्कादायक खुलासे त्यांनी केले जर मला बलिदान देऊन न्याय मिळत असेल तर मी तेही सुद्धा बलिदान द्यायला तयार आहे.

प्रशासनाला माझं सुद्धा बलिदान घ्यायचं का हा जबाब नागरे ताईने त्यांच्या निवेदनामध्ये राज्य सरकारला विचारला सिंदखेडराजा येथे उपविभागीय कार्यालय देऊळगावराजा येथे तहसील कार्यालय आणि अंढेरा पोलीस स्टेशन यांना निवेदनाद्वारे माहिती दिली आणि अखेर आज २१ जुलै रोजी अकरा वाजता पतीच्या प्रतिमेचे पूजन करून श्रीमती स्वातीताई नागरे अखेर अन्नत्याग आमरण उपोषणाला बसल्या आता तरी राज्य सरकार या स्वातीताई नागरे यांच्या उपोषणाकडे कशा पद्धतीने पाहणार आहे.आणि हे उपोषण कशा पद्धतीने हाताळणार आहे याकडे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

स्वातीताई नागरे यांच्या प्रमुख मागण्या :

माझ्या १४ गावांना शेतीसाठी पाणी द्या. माझ्या मुलांना दत्तक घेतल्याची व्याख्या तुम्ही मला लेखी स्वरूपात मुख्यमंत्री साहेबांच्या हस्ताक्षरात सहित मला माहिती द्या. मुलांच्या शिक्षणासाठी ५० लाख रुपये मदत द्या.मला व माझ्या मुलांना व मला शासकीय नोकरी द्या. अशा अनेक मागण्या त्यांनी त्यांच्या निवेदनामध्ये केल्या आहे. आणि अखेर त्यांच्या निवेदन देऊन दहा ते अकरा दिवस उलटून सुद्धा प्रशासनाने कुठलीच दखल न घेतल्यामुळे त्यांनी आज उपोषणाचा अखेर दिवस उगवला. आज उपोषण स्थळी शेतकरी योद्धा कृती समितीचे संस्थापक अध्यक्ष श्री बालाजी सोसे शेतकरी योद्धा कृती समितीचे प्रदेशाध्यक्ष श्री गजानन जायभाये व गावातील नागरिक उपस्थित होते आज प्रशासनाकडून पोलीस स्टेशनचे पीआय व तलाठी मॅडम व अनेक कर्मचाऱ्यांनी आज उपोषणाला भेट दिली स्वातीताई नागरे यांनी परत एकदा माहिती समोर आणली.बीड प्रकरण संतोष देशमुख यांच्या मुलांना जशा पद्धतीने सरकारने न्याय दिला तशाच पद्धतीने माझ्या मुलांना सुद्धा न्याय द्यावा जर सरकारला बलिदान घ्यायचा असेल तर तेही सुद्धा मी त्याला तयारी आहे असे पत्रकारांशी बोलताना त्यांनी सांगितले.